**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
**Aurangabad – 431 004, Maharashtra,India**
NAAC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Affiliation: (0240) 2403118/ 119/ 115
Web Site : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**औरंगाबाद- ४३१ ००४, महाराष्ट्र, भारत**
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office : Academic Section
कार्यालय :- शैक्षणिक विभाग (संलग्नीकरण)

संदर्भ क्र. : शैक्ष/ संलग्न/ एबीएम/ २०२३-२४/ 13958-61 दिनांक:- २२-०९-२०२३

प्रति,
**अध्यक्ष / सचिव / प्राचार्य,**
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

**विषयः-** **शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ साठी नवीन महाविद्यालय / परिसंस्थाचे प्रस्ताव सादर करणे बाबत.**
**संदर्भ:-** १) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे पत्र क्र.बृहत २०२३/प्र.क्र.५/विशि-५, दि.२२-०९-२०२३.
२) महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम २०१६ चे कलम १०९ (३) (क).
३) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि-४, दिनांक १५ सप्टेंबर, २०१७.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करीता संदर्भिय क्र. (१) अन्वये नवीन महाविद्यालय / परिसंस्थासाठी शासनाने बृहत आराखडा मंजूर केलेला आहे. सदरील बृहत आराखडयाप्रमाणे मंजूर स्थळबिंदुसाठी नवीन महाविद्यालय / परिसंस्थासाठी संदर्भीय क्र.२ व ३ मधील तरतुदींनूसार पात्र संस्थांकडून दि. ३० सप्टेंबर, २०२३ पर्यंत नियामामध्ये विहित केलेल्या प्रारुप / नमुन्यामध्ये ऑनलाईन अर्ज सादर करावेत. अध्यादेश क्र.१५१, १५२ व १५२ (A) अन्वये विहित केलेल्या शुल्काचा ऑनलाईनद्वारे भरणा करुन विहित नमुन्यातील अर्ज दि. ३० सप्टेंबर, २०२३ पर्यंत ऑनलाईनद्वारे विद्यापीठास अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

प्रस्तुत प्रकरणी विहित नमुन्यातील अर्ज व विहित शुल्काचे चलन व पुरक दस्ताऐवजासह दि. ०५ ऑक्टोबर, २०२३ पर्यंत हार्डकॉपी विद्यापीठ कार्यालयाचे शैक्षणिक विभागास सादर करणे आवश्यक आहे. विद्यापीठाने निर्धारित केलेल्या दिनांकानंतर कोणतेही प्रस्ताव स्विकारले जाणार नाही, याची कृपया सर्व संबंधितांनी नोंद घेण्यात यावी. सविस्तर माहितीसाठी विद्यापीठाच्या http://www.bamu.ac.in/ या संकेतस्थळावर Online Affiliation या लिंकवर भेट द्यावी.

**कुलसचिव**

**प्रतिलीपी:-**

१. संचालक, युनिक विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना देण्यात येवून सुचित करण्यात येते की, वरीलप्रमाणे शासनाने मंजूर केलेल्या बृहत आराखडयानुसार नवीन महाविद्यालय / परिसंस्थांचे प्रस्ताव संबंधित दिनांक ३० सप्टेंबर, २०२३ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने व अध्यादेश क्र.१५१, १५२ व १५२ (A) नुसार विहित शुल्क ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्याची प्रक्रिया करावी. यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर तात्काळ लिंक सुरू करून दि. ३० सप्टेंबर, २०२३ पर्यंत सुरु ठेवण्यात यावी.

२. वित्त व लेखा अधिकारी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना देउन कळविण्यात येत की, प्रस्तुत प्रकरणी ऑनलाईन शुल्क स्विकारण्यासाठी युनिक विभाग व बँकेच्या सहकार्याने API व्दारे विहित शुल्क स्विकारण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

३. जनसंपर्क अधिकारी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना माहिती व कार्यवाहीस्तव अग्रेषित.

**कुलसचिव**

**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
**Aurangabad – 431 004, Maharashtra, India**
NAAC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Affiliation: (0240) 2403118/119/115
Web Site : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
**औरंगाबाद- ४३१ ००४, महाराष्ट्र, भारत**
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office : Academic Section
कार्यालय :- शैक्षणिक विभाग (संलग्नीकरण)

## शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता प्रस्तावित नविन महाविद्यालय / परिसंस्थांसाठी प्रस्ताव सादर करणे संदर्भात निर्देश / सुचना :

१) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे पत्र दि. २२ सप्टेंबर, २०२३ नुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करीता नवीन महाविद्यालय / नवीन परिसंस्था साठी स्थळ बिंदुना मान्यता देण्यात आलेली असून त्याची प्रत या सोबत जोडलेली आहे. त्यांनुसार व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ ३ (क) व शासन निर्णय दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ मधील तरतुदींनूसार सर्व बाबींची पुर्तता करणा-या संस्थाकडून नवीन महाविद्यालय / परिसंस्था यासाठी **दि. ३० सप्टेंबर, २०२३** पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्जाची हार्डकॉपी विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागात **दि. ०५ ऑक्टोबर, २०२३** पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करणे आवश्यक आहे.

२) प्रस्तुत प्रकरणी **अध्यादेश-१५१, १५२ व १५२A अन्वये** विहित केल्यानुसार सर्व संबंधित संस्था / महाविद्यालयांनी शुल्काचा भरणा ऑनलाईन करणे आवश्यक आहे व विहित केलेल्या प्रक्रियेनुसार चलन प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे.

३) नविन प्रस्तावित महाविद्यालयासाठी शासन निर्णय क्र.एनजीसी २०१७/(२९/१७)मशि-४, दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ नुसार शासनाने विहित केलेल्या **परिशिष्ठ ``अ``** मध्ये प्रस्ताव सादर करणे आवश्यक असून शासन निर्णयामध्ये नमुद कार्यपध्दतीनूसार व परिशिष्ट **`ब`** मध्ये विहित केल्याप्रमाणे जसे की, महानगरपालिका क्षेत्रामध्ये अद्ययावत इमारत व संपूर्ण भौतिक सुविधेसह अर्धा एकर महाविद्यालयाची जागा असणे आवश्यक आहे. नगरपालिका क्षेत्राअंतर्गत एक एकर व ग्रामपंचायत / ग्रामीण क्षेत्रासाठी तीन एकर जमिनीबाबत संस्थेच्या स्वत:च्या मालकीची किंवा अधिकृत रजिस्टर भाडेपट्टा ई. प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. सविस्तर माहिती दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ च्या शासन निर्णयाप्रमाणे आहे. सदर शासन निर्णय सोबत जोडलेला आहे त्यातील सर्व अटी व शर्तीची पुर्तता करणा-या व शासन पत्र दिनांक २२ सप्टेंबर, २०२३ मध्ये दर्शविलेल्या स्थळ बिंदुसाठीच नवीन महाविद्यालय / परिसंस्थाचे प्रस्ताव सादर करावेत.

४) नविन प्रस्तावित महाविद्यालयाच्या प्रस्तावासोबत **पारंपारिक महाविद्यालयासाठी रुपये ७ लाख व विधी महाविद्यालयासाठी रुपये १५ लाखाचे राष्ट्रीयकृत शेडयूल बँकेमध्ये किमान पाच वर्षासाठी विद्यापीठ व संस्थेच्या नावे संयुक्त मुदत ठेव (एफ.डी.) प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे.**

५) मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांनी दिलेल्या निर्णयानुसार एकाच संस्थेचे विविध महाविद्यालय किंवा एकापेक्षा जास्त नविन प्रस्तावित महाविद्यालयासाठी संस्थेने अर्ज केल्यास शासन निर्णय दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ मधील तरतुदीनुसार व **मुद्दा क्र. (४) अन्वये**

**विनिर्धिष्ठीत केल्यानुसार महाविद्यालय निहाय प्रस्तावासोबत स्वतंत्र एफ.डी. सादर करणे आवश्यक आहे.**

६) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०८ व शासन निर्णय दि. १५-०९-२०१७ अन्वये विहित केलेल्या भौतिक / पायाभूत सुविधा संबंधित नविन प्रस्तावित महाविद्यालयाकडे असणे आवश्यक आहे.

७) शासन निर्णय दिनांक १५-०९-२०१७ अन्वये विहित केल्यानुसार **अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयाच्या संस्थेस नविन महाविद्यालयासाठी प्रस्ताव सादर करावयाचे असल्यास जून्या महाविद्यालयाचे नॅक मुल्यांकन /पुनर्रमुल्यांकन झाल्याशिवाय सर्व संबंधित संस्थेने नविन प्रस्तावित महाविद्यालयाचे प्रस्ताव ग्राहय धरण्यात येणार नाही.**

८) महाराष्ट्र शासनाने दिनांक २२ सप्टेंबर, २०२३ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार मान्य केलेल्या बृहत आराखडयाप्रमाणे शहर / गाव निहाय निश्चित करण्यात आलेले बिंदू बृहत आराखडा तयार करतांना शासनाने निर्देशित केलेल्या मार्गदर्शक सुचनांचे काटेकोर पालन करुन मंजूर स्थळ बिंदू सदरील बृहत आराखडयामध्ये कायम करणे किंवा वगळणे याबाबत विद्यापीठ प्राधीकरणाचा अंतिम निर्णय सर्व संबंधितांना लागू राहील. तसेच उक्त प्रकरणी मा. न्यायालयामध्ये याचिका दाखल झाल्यास तद्अनुषंगाने मा. न्यायालयाचा निर्णय सुध्दा सर्व संबंधितांना लागू राहील, याचीही कृपया नोंद घेण्यात यावी.

९) प्रस्तुत प्रकरणी एन.सी.टी.ई., ए.आय.सी.टी.ई., बार कॉन्सिल ऑफ इंडिया, कॉन्सिल ऑफ फार्मसी, कॉन्सिल ऑफ आर्किटेक्चर इत्यादी व तत्सम केंद्रीय प्राधीकरणाअंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी सदरील प्राधीकरणाची मान्यता असल्याशिवाय सर्व संबंधित संस्थांना सदरील अभ्यासक्रमाचे महाविद्यालय सुरु करता येणार नाही. तसेच बृहत आराखडयानुसार सर्व संबंधित संस्था / परिसंस्थांनी विद्यापीठास तसेच सदरील केंद्रीय प्राधिकरणास विहित केलेल्या नियमानुसार अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

१०) विद्यापीठ अध्यादेश-१५१, १५२ व १५२A अन्वये विहित केल्यानुसार **सर्व संबंधित संस्थांनी नविन प्रस्तावित महाविद्यालयाच्या प्रस्तावासाठी, प्रस्तावासोबत सादर केलेले प्रक्रिया शुल्क परत मिळणार नाही किंवा सदरील शुल्क ना परतावा असेल,** याचीही कृपया नोंद घेण्यात यावी.

११) प्रस्तुत प्रकरणी बृहत आराखडा संदर्भात यापूढे शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय सर्व संबंधितांना लागू राहील, याचीही कृपया नोंद घेण्यात यावी.

१२) महाराष्ट्र शासनाने शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ साठी निश्चित करण्यात आलेल्या **स्थळबिंदू बाहेरील ठिकाणासाठी संस्था / परिसंस्थांकडून अर्ज प्राप्त झाल्यास त्यावर कोणतीही प्रक्रिया केली जाणार नाही** किंवा **तद्अनुषंगाने महाराष्ट्र शासनाकडे प्रस्तावांची शिफारस करण्यात येणार नाही.** तसेच तद्अनुषंगाने नियमबाहय प्रस्तावावर सुध्दा कोणतीही प्रक्रिया केली जाणार नाही, याचीही कृपया नोंद घेण्यात यावी.

**संदर्भ क्र.** शैक्ष/संलग्न/२०२३-२४/ 13955-57

**दिनांक** २२-०९-२०२३.

**कुलसचिव**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**औरंगाबाद.**